महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK
MUHS
दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक- ४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik – 422004
Tel : (0253) 2539171/174 ☎ Student Helpline : 0253-2539111/6659111
Website: www.muhs.ac.in, E-mail: sw@muhs.ac.in

डॉ. देवेंद्र शेषराव पाटील
एम.डी.(होमिओपॅथी)
संचालक, विद्यार्थी कल्याण

Dr. Devendra Sheshrao Patil
M.D. (Homoeopathy)
Director, Student Welfare

जा.क्र: मआविवि/वि.क./रासेयो/ 360 /२०२६ दि. १२/०२/२०२६

NSS NEW UNIT ALLOTMENT

प्रति,
मा.प्राचार्य,
श्रीमती विमलताई भटेसिंग रघुवंशी कॉलेज ऑफ नर्सिंग
खोडाई माता रोड जीटीपी कॉलेज जवळ,
नंदुरबार ता.जि.नंदुरबार - ४२५४१२

विषय :- राष्ट्रीय सेवा योजना अनुदानित एकक (National Service Scheme Subsidized Unit) सुरु करण्यास मान्यता देणेबाबत...

संदर्भ :- आपले पत्र क्र.NTVS/VRBCON/2025-26/191, DT.04/12/2025

महोदय / महोदया,

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये कळविण्यात येते की, संदर्भांकित पत्राद्वारे आपण राष्ट्रीय सेवा योजना एककाची **(National Service Scheme Unit)** मागणी केली आहे. **त्यानुसार आपल्या महाविद्यालयास ५० स्वयंसेवक (विद्यार्थी) संख्येचे राष्ट्रीय सेवा योजना अनुदानित एकक (National Service Scheme Subsidized Unit) शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून सुरु करण्यास खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून याव्दारे परवानगी देण्यात येत आहे.**

१. महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानाच समाजसेवा करणे, आपल्या जवळपासच्या परिसरातील लोकांमध्ये मिसळून त्यांना समजावून घेऊन रचनात्मक कार्य करणे, समाजसेवेच्या माध्यमातून स्वत:च्या व्यक्तिमत्वाचा विकास करणे, या उद्देशाने ही योजना सुरु झाली आहे.

२. राष्ट्रीय सेवा योजना ही केंद्र शासन यांची पुरस्कृत योजना आहे. विद्यापीठ सलंग्नित इच्छुक महाविद्यालयांनाच राष्ट्रीय सेवा योजना एकक देण्यात येते. या योजनेंतर्गत महाविद्यालयामार्फत नियमित उपक्रम व विशेष शिबीर असे दोन कार्यक्रम राबविणे अनिवार्य आहे. सदर उपक्रम राबविण्यासाठी **शासनाकडुन नियमित उपक्रम व विशेष शिबीरासाठी अनुदान देण्यात येते. त्यानुसार महाविद्यालय स्तरावर सदर उपक्रम राबविणेसाठी खर्च करावयाचा असतो.** रासेयो अनुदानित एकक महाविद्यालयांनी नियमांनुसार दोन्ही (नियमित उपक्रम व विशेष शिबीर) राबविणे अनिवार्य आहे.

३. महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेचे कामकाज पाहण्यासाठी एक कार्यक्रम अधिकारी व दोन सहाय्यक कार्यक्रम अधिकारी (एक पुरुष व एक महिला) यांची नियुक्ती करावी. रासेयो कार्यक्रम अधिकारी हे प्रपाठक **(Reader)** किंवा वरिष्ठ व्याख्याता **(Lecturer)** स्तरावरचे असावेत. रासेयो कार्यक्रम अधिकारी व सहाय्यक कार्यक्रम अधिकारी यांची नियुक्ती केल्यानंतर त्यांची माहिती विद्यापीठास तात्काळ सादर करावी.

४. राष्ट्रीय सेवा योजनेचे काम पाहण्यासाठी नियुक्त केलेले कार्यक्रम अधिकारी व सहाय्यक कार्यक्रम अधिकारी यांनी कमीत कमी ३ वर्षे काम करणे बंधनकारक राहील. त्यांचे नियुक्तीपत्र व ३ वर्षे काम करण्याचे त्यांनी दयावयाचे हमीपत्र विद्यापीठास सादर करावे.

५. रासेयो कार्यक्रम अधिकाऱ्यांसाठी ई.टी.आय.(ETI), इम्पॅनल्ड ट्रेनिंग इन्स्टिटयुट, राष्ट्रीय सेवा योजना, अहिल्यानगर यांच्याकडुन ०७ दिवसांची रासेयो परिचय प्रशिक्षण कार्यशाळा (Orientation Training) आयोजित

Noted.
To Mrs. Yogini S.
(NSS Programme Officer)

Inward 165
N.T.V.S's
Smt.Vimaltai Batesing Raghuvanshi
College of Nursing,Nandurbar

Scanned with OKEN Scanner

केली जाते. सदर कार्यशाळेसाठी रासेयो कार्यक्रम अधिकारी व सहाय्यक कार्यक्रम अधिकारी यांना विद्यापीठाकडून आदेश प्राप्त झाल्यानंतर महाविद्यालयाने त्यांना प्रशिक्षणासाठी पाठवावे. सदर प्रशिक्षणाचा खर्च संबंधित महाविद्यालयाने करावा. प्रत्येक कार्यक्रम अधिकाऱ्यांनी त्यांच्या नियुक्तीच्या कालावधीत एकदा रासेयोचे परिचय प्रशिक्षण घेणे बंधनकारक आहे.

६. महाविद्यालय स्तरावर वर्षातून नियमित उपक्रम व विशेष शिबिर राबविणे अनिवार्य आहे. त्यानुसार नियमित उपक्रम व विशेष शिबिराकरिता शासनाकडून प्राप्त अनुदान विद्यापीठामार्फत PFMS प्रणालीद्वारे अनुदान वितरित करण्यात येते. **(उदा.१०० विद्यार्थी संख्या असलेले रासेयो एकक असल्यास नियमित उपक्रमासाठी रक्कम रु.३६,०००/- व विशेष शिबिरासाठी रक्कम रु.३५,०००/- असे एकूण रक्कम रु.७१,०००/- इतके अनुदान देय आहे.)** विद्यापीठामार्फत PFMS प्रणालीद्वारे वाटप करण्यात आलेले अनुदानाचा लेखापरिक्षण (Audit Report) अहवाल विद्यापीठाकडून देण्यात आलेल्या विहित नमुन्यात दरवर्षी माहे **एप्रिल** मध्ये विद्यापीठास सादर करणे अनिवार्य आहे.

७. महाविद्यालय स्तरावर राबविण्यात आलेल्या दोन्हीही उपक्रमासाठी उक्त अनुदान PFMS प्रणालीद्वारे घेणेकामी **रासेयो एककाचे (State Bank Of India) स्टेट बॅंक ऑफ इंडिया या बॅंकेत (ZBSA Curent Account) संयुक्त खाते महाविद्यालयाचे अधिष्ठाता/प्राचार्य व कार्यक्रम अधिकारी यांच्या संयुक्त स्वाक्षरीने खाते उघडून बॅंकेचे नाव, खाते क्रमांक, आयएसएफसी कोड वगैरे आवश्यक माहिती विद्यापीठास सादर करण्यात यावी.** अन्यथा संबंधित महाविद्यालयास अनुदान वितरित करण्यात येणार नाही. विद्यापीठाकडुन मिळालेले अनुदान रासेयोशी निगडीत सर्व व्यवहार या अनुदानातून करावा. विद्यापीठाकडुन मिळणाऱ्या अनुदान व्यतिरिक्तचा खर्च महाविद्यालयाने करावा. विद्यापीठाकडुन विभागुन देण्यात येणाऱ्या अनुदानाच्या रक्कमे व्यतिरीक्त एकाने/ महाविद्यालयाने नियमित कार्यक्रम व विशेष शिबिराकरिता केलेल्या अतिरिक्त खर्चाची प्रतिपुर्ती विद्यापीठाकडुन अनुज्ञेय नसेल.

८. आपल्या महाविद्यालयास विद्यापीठामार्फत देण्यात आलेल्या रासेयो विद्यार्थी संख्येनुसार रासेयो स्वयंसेवकांची नावनोंदणी (Enrollment) करण्यात यावी. राष्ट्रीय सेवा योजनेत स्वयंसेवकांची नोंदणी करतांना शक्यतो महाविद्यालयातील द्वितीय व तृतीय वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांचीच नोंदणी करावी. नोंदणी केलेल्या स्वयंसेवकांची प्रवर्गनिहाय नावाची विद्यापीठास sw@muhs.ac.in या ई-मेलवर Soft copy (Excel Sheet) व Hard Copy मध्ये पाठवावी. तसेच महाविद्यालय स्तरावर रासेयो विद्यार्थी/विद्यार्थीनी नोंदणी करतांना १७ टक्के अनुसुचित जाती (SC), ७ टक्के अनुसुचित जमाती(ST) व ७६ टक्के इतर(OBC) याप्रमाणे विद्यार्थी संख्या नोंदणी करण्यात यावी.

९. आपल्या महाविद्यालयास देण्यात येणारे रासेयो अनुदानित एकक संख्येनुसार रासेयोत सहभागी होणाऱ्या प्रत्येक स्वयंसेवकांकडून दरवर्षी प्रति विद्यार्थी रु.१०/- असे रासेयो प्रवेश (नोंदणी) शुल्क (NSS Contribution) म्हणून घेण्यात यावे. सदर नोंदणी शुल्क महाविद्यालय स्तरावर जमा केलेली एकत्रित रक्कम RTGS/NEFT द्वारे खालील नमुद विद्यापीठ रासेयो प्रशासकीय खात्यावर जमा करण्यात येवून भरणा केलेबाबतची माहिती sw@muhs.ac.in या ई-मेलद्वारे अथवा हार्ड कॉपी विद्यापीठास पाठविण्यात यावी. तद्नंतरच सदर स्वयंसेवकांची नावनोंदणी (Enrollment) केली जाईल, याची कृपया नोंद घ्यावी. कृपया कोणत्याही महाविद्यालयाने **धनादेश/धनाकर्ष** पाठविण्यात येवू नये. तसेच **ज्या महाविद्यालयाने रासेयो नोंदणी शुल्क दरवर्षी वर नमुद प्रमाणे खालील नमुद खातेक्रमांकावर न भरल्यास आपल्या महाविद्यालयाचे रासेयो एकक काढण्यात येईल, यांची संबंधित महाविद्यालयाने नोंद घ्यावी.**

Account Holder Name	**DIRECTOR STUDENTS WELFARE MUHS**
Bank Account No.	**20118652660**
IFSC Code	**MAHB0000332**
Name of Bank & Branch	**Bank of Maharashtra Panchavati, Nashik**
MICR NO.	**422014010**

Scanned with OKEN Scanner

१०. राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये सहभागी होणाऱ्या स्वयंसेवकांनी नियमित कार्यक्रमांमध्ये दोन वर्षे (प्रति वर्ष १२० तास) तसेच मंजूर केलेल्या एकक संख्येच्या ५० टक्के स्वयंसेवकांनी सात (०७) दिवसांच्या विशेष शिबीर कार्यक्रमात एकदा सहभागी होणे बंधनकारक राहिल.

११. राष्ट्रीय सेवा योजना एकक महाविद्यालय यांनी वर्षभरात नियमित उपक्रम राबवावे. तसेच रासेयो अंतर्गत सात दिवशीस निवासी विशेष हिवाळी शिबिर विद्यापीठाकडून याबाबतचे पत्र प्राप्त झालेनंतर महाविद्यालयाने दत्तक घेतलेल्या गावामध्ये आयोजित करण्यात यावे. तद्नंतर नियमित उपक्रम व विशेष शिबीर कार्यक्रमाच्या संपुर्ण जमा खर्चाचे वेगवेगळे (स्वतंत्र) हिशोब सनदी लेखापरिक्षकाकडुन **(C. A.)** लेखापरीक्षण **(Audit)** करुन घ्यावे. महाविद्यालयास विद्यापीठाकडून प्रत्येक आर्थिक वर्षासाठी देण्यात येणाऱ्या नियमित उपक्रम व विशेष शिबीर कार्यक्रमाच्या अनुदानाच्या रकमेचा लेखापरिक्षण अहवाल **(Audit Report)** हिशोब विद्यापीठाकडून देण्यात आलेल्या विहीत नमुन्यात कुठल्याही परिस्थितीत प्रत्येकवर्षी **दि.१० एप्रिल** पर्यंत विद्यापीठास प्राधान्यक्रमाने सादर करावेत. रासेयोच्या कार्यक्रमांसाठी खरेदी केलेल्या वस्तुंच्या बिलाची छायांकित प्रत अधिष्ठाता/प्राचार्य यांच्या स्वाक्षरीने साक्षांकित करुन हिशोबासोबत सादर कराव्यात. **सदर हिशोब वेळेत प्राप्त न झाल्यास आपल्या महाविद्यालयाने सदर वर्षाचे विद्यापीठ अनुदान खर्च केले नाही असे समजण्यात येवून देण्यात आलेले अनुदान महाविद्यालयाकडुन परत घेण्यात येईल, किंवा महाविद्यालयाने केलेल्या खर्चाची प्रतिपुर्ती करण्यात येणार नाही. तसेच संबंधित महाविद्यालय रासेयो अनुदानित एकक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम राबविण्यास अकार्यक्षम आहे, असे समजून एकक बंद करणेबाबत विद्यापीठ स्तरावरुन कार्यवाही करण्यात येईल, याची कृपया संबंधित महाविद्यालयातील अधिष्ठाता/प्राचार्य व रासेयो कार्यक्रम अधिकारी यांनी विशेष नोंद घ्यावी.**

१२. राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत महाविद्यालय स्तरावर राबविण्यात येणारे नियमित उपक्रम व विशेष शिबिराची अद्यावत माहिती वेळोवेळी विद्यापीठास सादर करण्यात यावी.

१३. महाविद्यालयातील रासेयो एककाचा ४ फुट × ३ फुट आकाराचा फलक तयार करुन महाविद्यालयाच्या दर्शनी भागावर लावावा.

यास्तव, वरील उपरोक्त ०१ ते १३ बाबीचे परिपूर्ण अवलोकन करण्यात येवून महाविद्यालय स्तरावर राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत समाजपयोगी उपक्रम राबवून प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

१/१०/२०२६

सचिवलेक,
विद्यार्थी कल्याण तथा,
रासेयो कार्यक्रम समन्वयक
म.आ.वि.वि.नाशिक

सोबत -

१) NSS Annual Action plan

२) NSS SOP

Scanned with OKEN Scanner